## प्रकरण तिसरे

## " गावाकडची माती " चे वेगळेपण

" गावाकडची माती " हा प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा १९८४ साली प्रसिध्द झालेला पहिला ललितनिबंध संग्रह होय.

यातील सगळे लेख ग्रामसंस्कृतीशी निगडित असे आहेत. मराठी-तील ललित निबंधही बरीच वर्षे नागर-शहरी जीवनांतील अनुभवाभोवतीच घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे फिरत होता. नागरजीवनाच्या पलिकडे प्रे विस्तृत असे ग्रामजीवन आहे, त्या ग्रामजीवनांतील ललित अनुभवाकडे या नागर ललितनिबंधकाराचे लक्ष गेलेच नाही. कदाचित त्या अनुभवाची स्वानुभवशून्यता हे कारण असू शकेल. तथापि जे घडले ते स्पष्ट आहे. १९२६ साली " गुजगोष्ट -" म्हणून अवतरलेला आणि १९४५ पर्यंत लघुनिबंध म्हणून स्थिर झालेला आणि स्वातंत्र्योत्तर कालांत ललितनिबंध म्हणून अनेक पोटवाङ्‌मयप्रकारांना आपल्यांत सामावून घेऊन लोकप्रिय झालेला हा लेखनप्रकार १९६५ पर्यंत नागर अनुभवांनी साचेबंद होत होता. मध्यवर्गीय जीवनांतील अनुभवांना या कालखंडातील लेखकांनी " लालित्य" प्राप्त करुन दिले हे खरे आहे, तथापि त्याच त्याच अनुभवांची पुनरावृत्ती होऊ लागली. अनुभव, भाषा आणि निवेदन या दृष्टीने हा निबंध समृध्द

झाला पण " सर्वस्पर्शी " झाला नाही. कारण ग्रामसंस्कृती-पासून हा निबंध दूर राहिला. आणि म्हणून ग्रामसंस्कृतीतील सकस आणि संपन्न अनुभवावर ज्यानी आपल्या ललित निबंधाची उभारणी केली प्रा. चंद्रकुमार नलगे ( गावाकडची माती - १९८४) यांच्या ललितलेखनाला एक आगळे, अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त होणे साहजिक आहे.

## मातीच्या ओढीतील सृजन

ज्या मातीच्या कुशीत माणूस जन्मतो, खेळतो, नाचतो, हुंदडतो, रानवा-यात रानशीळ घालतो, वादळवा-याबरोबर वादळ होऊन आकाशाछतापर्यंत गिरगिरत राहतो, भन्नाट वा-याची संगत करतो, त्या मातीची ओढ माणूस आयुष्यभर अतिशय श्रध्देने, निष्ठेने जोपासतो. पृथ्वीच्या पाठीवर हा माणूस कुठेही असला तरी बाळपावलाशी लागलेल्या मातीची खूण तो विसरत नाही

प्रा. नलगे यांना या मातीची विलक्षण ओढ. मोठेपणी शहरांत नोकरीपेशानिमित्त वास्तव्य करतानाही त्यांच्या अंतर्यामी ही मातीची ओढ खोलवर रुजलेली. या मातीचा डोहाळा त्याना लागतो., आणि त्यांतून 'गावाकडची माती"तील तेरा लेखांचे सृजन होते.

## विविध अनुभवातील लालित्य

या तेरा लेखांतून ग्रामसंस्कृतीतील विविध अनुभव अभिव्यक्त झालेले आहेत. या लेखसंग्रहाचे वेगळेपण यातील 'अनुभवलालित्यांत आहे. अनुभवाच्या विविध परी समजावून घेण्यासाठी " माती"तून फेरफटका मारणे आवश्यक आहे.

विविध लोककलाकार

" मातीचे डोहाळे " यांत वारा, कोसळणारा आषाढ, काळेकुट्ट ढग, गारांचा वर्षाव, महापूर, सापकिरडू, फड्यानिवडुंगाची लालगर्द बोंडे, पोपटांचा थवा, वाघ, अम्वल आणि साळिंदर, आंब्याची जुनाट ढोली, पिंपळावरचा मुंजा, भूताट-यातली म्हावसट आणि मशिदीतला पारवा यांच लेखकाच्या बालमनाशी जडलेलं नातं उलगडत जातं. गावातील देऊळ, देवळांतील देवादिकांच्या तसबिरी, त्यांच श्रावण महिन्यातील कुरुक्षेत्र या हकीकती सांगता सांगता लेखक मातीशी जडलेल्या नात्याचं गुपित उघडकरतो. मातीनं उदार होऊन सुगीची दौलत अधळल्यावर गावात चैतन्य मूर्तिमंत होतं, आणि लेखक गावात " देवाजीचं येणं" झाल्याच्या खुणा सांगतो. या खुणा नंदीबैलवाल्याच्या, कडकलक्ष्मीच्या असतात. कडकलक्ष्मीच्या वेळची भीती म्हणजे मुलांच्या चड्ड्या " जाग्या"वर नसतात. सुगी सुरू झाली, की गावात कुणाकुणाचं आगमन होतं, ( ज्यांत बालमन रंगून गेलेलं असतं) त्याचं तपशीलवार वर्णन लेखक पुढे करतो. डोंबारी, माकडवाला, दरवेशी, गारुडी, पोतराज, मनकवडी, बैरागीगोसावी, फकीर, कोल्हाटीण, कोकवाला, जोगतिणी, दांगट, जादूवाला, बहुरूपी, मुंबयवाला, कुडबुडणं जोशी आणि वासुदेव इ. मंडळी बालकांचा कौतुकविषय झालेली. त्यांना रिझविणारी, जीवनाचा एक एक पैलू दर्शविणारी. लोकरंजनासाठी निर्माण झालेल्या या लोककला म्हणजे मातीचाच हुंकार असतो. यांच्या सहवासातील क्षण मंतरलेले. या मातीशी नातं तुटल्यामुळ, जे एक एकाकीपण येतं, त्याचं वर्णन रखरखीत दुपारी आकाशांत एकाकीपणं हिंडणा-या घारीच्या समर्पक प्रतिमेन केलं जातं.

## निसर्गाचा काव्यमय संवेदनशील आविष्कार

" सोनसळ " या लेखांत लेखकाच्या प्रवासवेडया मनाचा आणि माणसाला लोभावणा-या निसर्गाचा अतिशय संवेदनशील आविष्कार आढळतो. ललितलेखकाच्या ठिकाणी असणा-या काव्यात्म वृत्तीचे दर्शन या लेखांत आढळते. नलगे यांच्या अतिशय कल्पक, तरल, हळुवार आणि ऐंद्रिय संवेदना जागवणा-या कविमनाचा विलास या लेखाच्या वाक्यावाक्यांत पहावयास मिळतो. एकदा श्रावणांत उल्हास हरवलेल्या लेखकाच्या मनानं जी भ्रमंती केली, त्याच्या काव्यात्म आविष्कारानी हा लेख इंवरुन निघाला आहे. काळं कातळ, धबधबा, देऊळ, देवळातल्या पुजारिणीचे दिलखेचक पण वासनेने डबडबलेले डोळे, पैलतीर, झुलतापूल, हिरव्या चुडयाची विद्यार्थिनी, शेवाळलेली पायवाट, पहाड, उसळत वाहणारा नदीचा प्रवाह यांना पार करुन आल्यावर -

" ती एकदम दिसली. लगतच्या आडोशाला कातळावर बसून सचैल स्नान करणारी ...पाण्याशी मुक्तपणे मुक्तपण देणारी ओलेती...सचैल भिजक्या केसांची ती.....गुलाबी वर्णाची... नितांत वर्णाची.... नितांत कायेची ती यौवना....कुणी राधा पात्रांत उतरावी तसचं ते देखणं स्वप्नवेडं चित्र होतं. माझ्या पावलांचा आवाज झाला. ती गडबडली....कावरुन गेली. बावरुन थबकली. तिचं सशाचं काळीज लुकलुकलं. तिनं माझ्यावर नजर टाकली"[1] दृष्टी सौंदर्यवेधी असली, की क्रियापदेही किती सुंदर आणि अर्थव्यंजक होतात हे वरील उता-यावरुन स्पष्ट कळून येते.

## सांगीवांगीच्या वाटा आणि बालमनाच्या गमती

गावगाडयाच्या वाटा जशा हुरहुरत्या सांगीवांगीच्या तशाच त्या ग्रामसंस्कृतीतील हिरवेपणाच्याही. या वाटाना संवेदना बहाल केली,

की त्यातील सौंदर्य आपल्यापुढे खुल होऊन जातं "माणूस इथल्या मातीचं नातं सांगतो, तेव्हाच सर्व वाटा त्याच्या लालचुटुक नाजूक पावलाशी येऊन थांबलेल्या असतात."[२] हे सूत्र घेऊन "गावाकडच्या वाटा : हुरहुरत्या सांगीवांगीच्या" हा लेख अवतरलेला आहे. पहिली वाट पाळण्याच्या रेशीमकाडीशी गुंगारा देऊन उंबरठा ओलांडल्याची. दुसरी वाट बाजारची, खमंग वासाची, साखरकांडया बत्ताशाची. तिसरी वाट शाळेची. नव्या पुस्तकाच्या करकरीत वासाची. नव्या गणवेषांत ठुमकत जाणारी. चौथी डोंगरकडेनं जाणारी आणि पाचवी डोहाची. या वाटा जीवनाला जोडीत जातात. लेखकाचे बालमन या वाटातील सौंदर्य आणि चैतन्य दाखवत दाखवत, डोहावरील खाजकुइलीची गमतही खोडकरपणाने सांगते. इथं बालमनाचं निव्याॅज, निष्कपटी आणि गंमत-खोर दर्शन घडतं. बाळराजा आणि माकडाची पिल्लं यांच्यातील " कौतुक", माकडापासून बाळाला वाचवावयास आलेला म्हातारा, आणि बाळाला म्हातारा चोरून नेतोय या समजुतीनं त्या म्हाता-याभोवती माकडपिल्लांचा गिल्ला हे सारे वर्णन दृश्य आणि चित्रमय झालेले आहे.

आख्यायिका आणि दंतकथांचा वापर

गावाकडच्या भुतानी मराठी ग्रामीण साहित्याला चांगलंच खाद्य पुरवलंय. ललितलेखनही याला अपवाद नाही. शहरांतील नित्याच्या रूक्ष जीवनामुळे मनाला मरगळ येते तेव्हा लेखकाचे मन गावाकडची माती तुडवते. म्हावसटीची टेकडी, त्यावरील कावेच्या आंब्याचे झाड, चांदण्या रात्रीच्या धनगरी ओव्या, यांचा कैफच त्या मनाला चढलेला असतो. वारणाखो-याची आठवण आली, की फासोळ्या दाताची म्हावसट– जिच्याबद्दल अनेक आख्यायिका पसरलेल्या आहेत– नलगे यांच्या नजरेसमोर उभी राहते. मातीच्या बैलाना आणि लेखकालाही रंगवणारा तो कावेचा आंबा, बालमनाला स्वप्नातला राजकुमार वाटायचा. सीताफळाच्या टेकडीबद्दलही अशीच एक आख्यायिका. सीता एकदा रामावर रुसली

आणि या टेकडीवर येऊन बसली. भूक लागल्यावर हाताला आल्या त्या झाडाची फळं तिनं खाल्ली. त्या बियातून जे झाड उगवलं ते सीताफळाचं झाड. नलगे यांच्या बालमनाला कुठून तरी सीता यावी आणि शबरीप्रमाणे सीताफळं धावी असं वाटायचं.कोकरुडच्या विटीदांडूच्या माळाचीही लेखकाला आठवण येते. या माळावर पांडव विटीदांडू खेळत म्हणे. नदी पलिकडच्या फिफि-याच्या उतार माळाशी पण एक आख्यायिका निगडित. त्या माळावर तीन दगड एकावर एक ठेवलेली. वरची दगड नुसत्या करंगळीनं पाडली, की पिढयापिढयाचं दळिंदर नाहीसं होईल ही आख्यायिका. लेखकाला नाम्यानं ही गोष्ट सांगितली. आणि मग बालवीरांची फौज त्या दगडांच्या दिशेनं कूचकरु लागली. या वेळच्या रंगतदार गमती लेखकाने मोकळेपणाने सांगितलेल्या आहेत. इथला आत्माविष्कार दिलखुलास आहे. याच संदर्भात लेखकानं मांगरूळ च्या माळावरील अमावास्येच्या रात्रीची एक हकिकत सांगितली आहे. गणेश गवंड म्हणजे खविसाचं ठाणं ! अमापौर्णिमेला हा खवीस अनेकाना झपाटावयाचा. " गावाकडची भूतं " या लेखाचा शेवट " साती आसरा"नं केला आहे. साती आस-याच्या आठवणीत बालमनाची चिकित्सक बुध्दी दिसून येते. साती आस-याच्या आठवणीत बालमनाची चिकित्सक बुध्दी दिसून येते. साती आसरा म्हणजे लेखकाच्या शेतातील जुनाट विहीर. या साती आसरा माणसाना आत ओढून घेतात. कुणा बाईला त्यानी नेलं होतं आणि सात दिवसानी सोडलं होत. दिवसाढवळया कुणी या विहिरीकडे फिरकत नसे. लेखकाच्या बालमनानं तर्कशक्ती लढवल्यावर जाणवलं, की सैल वर्तनाच्या, नको असलेल्या स्त्रियानाच साती आसरांच्या या विहिरीचा आसरा मिळायचा. दिवस बदलले. विहिरीवर इंजीन बसवलं. विहिरीचा तळ लागला आणि साती आस-याच्या कल्पनाविश्वाला तडा गेला. भोळया समजुतीतून भुतांचा जन्म होत असतो. चिकित्सक, वैज्ञानिक दृष्टीने पाहिल्यावर या भुतातील " काव्य"च संपून जातं, हाच प्रत्यय लेखक इथे देतो.

" जत्रा" तील सौंदर्य

शिवरात्रीपासून तीन दिवस चालणाऱ्या लेखकाच्या गावच्या नीलकंठेश्वर देवाच्या यात्रेची सविस्तर हकिकत " जत्रांचे मंतरलेले दिवस" या लेखांत येते. यात्रा म्हटली, की बालमनाला उधाण चढतं. यात्रेच्या वेळी गांव कसं चैतन्यानं फुलून येतं, याचं बालकाच्या उत्सुक, हावऱ्या, कुतूहलपूर्ण नजरेंन दर्शन या लेखांत घडवलं आहे. नीलकंठेश्वराच्या दोन मूर्ती. एक पितळेची आणि दुसरी चांदीची. या दोन मूर्तींच्या संदर्भांत बालमनांत आंतरिक संघर्ष कसा निर्माण होतो याचे मानसशास्त्रीय पृथःकरण या लेखांत येते. यात्रा आणि तमाशा दोन्ही हातात हात घालून जणारे. तमाशाचा फड, त्याबद्दल गावकऱ्यांची उत्सुकता, त्यांच्यातील बोलाचाली यानी यात्रेच्या वातावरणाला एक वेगळी रंगत येते. " ढोलकी, तुणतुण्याची धुमाळी प्रेक्षकांची मनं जिंकून मंदावता मंदावता धिमा ठेका धरते. अन् त्याचवेळी " छुन्नुक छुन्नुक छर्रर्र असा पायातल्या चाळांचा आवाज कानी पडतो. बघ्यांना हवं ते येत असत. फेटे काढतात. नीट सावरुन बसतात. बघे मंडळी तर चवडयावर येऊन पाहात राहतात. उत्सुकता अधिरी होते. तेव्हाच पदर पडावाच्या शिडासारखा उंच आभाळांत धरत, पाठमोरं नाचतनाचत बघ्यांच कुण्या देशी हरवलेलं गुलजार पाखरुं येत असतं. छुन्नुक छुन्नुक तालातलं ढोलकीच्या वेधक ठेक्यातलं, तुणतुणंझांजच्या मोहक सुरातलं, पाठमोरं नशेलल्य कैकांच्या डोळयांच पारणं फेडीत, तर कैकांना घायाळ करीत समोर येत असतं. वाद्यांची लय वाढते. चपळ होते. पदराच्या शिडात वारं शिरतं, नाचीच्या अंगात नृत्य शिरतं. नाची गिरकी घेऊन विजेसारखी लकलकते. घुंगरांचे पाय जमिनीवर ठरत नसतात. धुरोळा उठतो. नाचता नाचता साऱ्यांच्याच अंगात न आवरणारी नाचाची खुमारी चढते. नाचीवर नजर ठरत नाही. अन् तेव्हाच हवेत फटके उडतात. शिटयांचा वर्षाव घुमतो. बघ्यांची छंदी काळजं नाचीच्या पायाखाली केव्हा अंथरली गेलेली असतात ते त्यांच त्यानाच माहिती नसतं. "[3] वरील उताऱ्यातील, मोजक्या

शब्दांतील नाचीचं वर्णन म्हणजे एक कविताच ! निरीक्षण, वर्णनातील गतिमानता आणि प्रसंग Visual करण्याचे भाषिक कौशल्य, यामुळे नलगे लालित्या"च्या वेगळ्या धुंदीत वाचकांना घेऊन जातात. "वादळ-वा-याच्या नांवानं चांगभलं " या लेखांत जोतिबाच्या विस्कटलेल्या यात्रेचेही, नलगे तितकेच मूर्तिमंत ( Concrete ) आणि सजीव (lifelike) चित्रण करतात. वादळवा-याच्या थैमानाचं आणि उचकटलेल्या यात्रेचे हे दुसरे रूपही उत्कटत्वानेच प्रत्ययाला येते.

"हुरडयांतली रंगत "

" खमंग हुरडयाचे खमंग दिवस " म्हटले, की हिरवट दुधाळू झालेल्या भरदार घोसांच्या देखण्या जोंधळयाच्या शिवाराचा पट्टाच पट्टा लेखकाच्या नजरेसमोर उभा राहतो. वाफ्यावाफ्यातून, झाडाझाडातून कलकलणा-या भोरडयांची भुर्रकन उडणारी झुंडच्या झुंड मनाला दंग करुन टाकते. चिमण्या पाखंराच्या घुळका रानभर सतावताना दिसतात. जोंधळयाच्या माळयावर पाखरांना हाकारा घालणारे राखणे हुरहुरत्या थंडीतही गोफण फिरवीत असतात. " आला रं आला, घोळका आला" च्या आवाजानं सारं शिवार दुमदुमलेलं असतं. कुणी डबा वाजवतं, तर कुणी फुटकी थाळी तर कुणी नुसतं ओरडतंच असतं. राखणे आणि पाखरं यांचा पाठशिवणीचा खेळ अखंड चाललेला असतो. आकाशभूळ पसरलेली पाखरं, खमंग चवदार उनउनीत हुरडा यांच्या घाईगर्दीत सुगी केव्हा येते हे कळत नाही. जोंधळयांचा हुरडा संपत येतो आणि मचळयावरच्या हाका-यांत एकच हाकाटी उठते - " सोले करुं या रं सोलं ! " मग कुणी विस्तव आणतं. कुणी काटक्या. कुणी मीठ, कुणी चटणीची पुडी, कुणी वरण्याच्या शेंगा - आणि या सर्वांचं मिश्रण चुलीवर ठेवलं जातं. उनउनीत बिनतेलाचं सोलं तोंड भाजून घेत खाण्यातील मौज आगळीच. तेवढयात चुकार पक्ष्यांचा थवा येतो आणि हे राखणे, हात भाजत असतानाही सोलं हातात घेऊन पाखंराच्या दिशेनं पळू लागतात. यानंतर लेखक चांदण्या

रात्रीच्या एका वेगळयाच हुरडयाच्या बेताची झालेली फटफ. ती सांगतो. हे राखणे वेगवेगळया दिशेने हरभ-याच्या, वाटाण्याच्या आणि गव्हाच्या वाफ्याकडे जातात. चुकून एकमेकांच्या समोर आल्यावर कुणीतरी येतंय या भीतीने सगळयांची गाळण उडते. आणि मग वाट फुटेल तिकडे खळग्यातून, दगडगोटयातून, काटयातून पळण्याची एकच धमाल उडते. झालेल्या या फटफजितीला दुस-या दिवशी खमंग फोडणी दिली जाते. मग हे पळपुटे आपल्या पराक्रमाच्याकथा रंगवून सांगू लागतात. हुरडा सा-यांच्याच अंगाशी आलेला असतो. पण लेखक म्हणतो - " पण त्यातच खरा रानातला गोड चकवा असतो ".

-

गु-हाळ: शेतक-यांचा कृतज्ञोत्सव
--------------------

आधुनिक कृषीविज्ञानानं ज्यातील सौंदर्य नष्ट केलं, त्यापैकी गु-हाळ एक होय. साखरकारखान्यांची भरमसाठ वाढ झाली. साखरेला दरही आला आणि ग्रामजीवनांतील गु-हाळाच्या रंगतीला ओहोटी लागली. गु-हाळाचा हंगाम म्हणजे शेतक-याच्या जीवनातला वर्षभरच्या श्रमसाफल्याचा, अपार कृतज्ञतेचा उत्सवच जणु ! कोणत्याही कार्याचा आरंभ देवतापूजनांन करावा ही भारतीय परंपरा. कृषीपरंपरेनं गु-हाळाची पण एक देवी मानली आहे. तिला घाणादेवी म्हणतात. कोणत्याही जातीच्या माणसाचं गु-हाळ असो, घाणादेवीचा मान चुकत नाही. कांही समाजात बकरी मारतात तर कांही समाजात पुरणपोळीचा नैवेद्य असतो. घाणादेवीच्या पूजेशिवाय गु-हाळाला आरंभच होत नाही. घाणादेवीच्या रशयाला उसूल यायला अवधी असतो तेव्हा शेतक-यांच्यात कुणाची घाणादेवी चांगली किंवा वाईट झाली, याच्या उखाळयापाखाळया सुरु होतात. यावेळच्या संभाषणांत एक स्वाभाविक रंगत असते. एखादी बोटी आणि रटरटणारा रस्सा भुरकला की गु-हाळाला सुरवात

होते. गुळण्या, चुलवाल्या, मांदाण्या, चिपाडया आणि आडझोडया सर्वांची फौज गु-हाळमांडवात तयार असते. काहील आली, की " पुंडलिक वरदा हरी " च्या गजरानं सारं शिवार दुमदुमून जातं. गु-हाळाची नशा जशी प्रौढांना तशीच ती बालचमूना. गु-हाळ कुणाचंही असो, तिथं हा चमू हजर. गु-हाळाच्या पूर्वी पै-पाव्हण्याना आवतनं जायची. गु-हाळाच्यावेळी मालकाच्या आनंदाचं चित्रण करतांना नलगे लिहिलात. " गुन्हाळाच्या मालकाला ऊस, आल्यालिंबूचा रस, उनउनीत गूळ वाटण्यात कोण आनंद वाटायचा! गावच्या लेकराबाळांनी यावं, बैत्यादलुंत्यांनी हक्क सांगावा, पाटील कुलकर्ण्यांनी पायधूळ झाडावी. सगळा गोतावळा जमावा नि सगळयांच्या संगतीनं, धरतीनं दिलेलं दान वाटून घावं यातच त्याच्या श्रमांच सार्थक वाटायचं."[४] भावात्मकतेने ललितलेख कसा उंचरून येतो या दृष्टीने या लेखाचा हा शेवट पहावा -" गु-हाळाचा पहिला दिवस पहिलाच रस, गूळ श्रध्देनं देवाला वाहण्याचा. देवाच्या अनुस्मरणाचा. शेवटचा दिवस तर चुकल्यामाकल्या थकल्याभागलेल्या, घरबैठया म्हाता-या कोता-याच्या आदरशील आठवणींचा. वय झालं असेल, नजर कमी झाली असेल, पाय ठकले असतील, पायाखालची वाट हरवली असेल, सगळीच उलथा-उलथीनी पांगापांग झाली असेल - अशांच्या खास करून आठवणीचा दिवस. त्या दिवशी कासंडीभर रस, केळीच्या पानातून मूठभर का होईना ताज्या गूळ त्यांच्या पायाशी जाई. थरथरत्या हातांच्या स्पर्शानेच त्यांची स्पर्श जाणीव होई नि सुरकुतलेल्या चेह-यावर कृतज्ञतेच्या अपार मायेचं पाणी डोळयातून झिरपत येई. अन् प्रकाश हरवलेल्या नजरेपुढं अवघ्या गु-हाळांच्या दिवसांचं रूप ब्रहम उमलत उमलत येई. चाचपडणा-या हाताला आकाशफूलच गवसे."[५] अपार कृतज्ञतेचे, माणुसकीचे हे झरे यंत्रसंस्कृतीने नष्ट केल्याची खिन्न जाणीव या लेखाच्या शेवटी बोचत राहते. या वेळची नलग्यांची भाषा जिव्हाळयाने अतीव ओलावते. तिला कारुण्याच पदर असतो.

गावाकडच्या नात्यांचा विविधरंगी गोफ

मृत्यूच्या सर्वशक्तिमानतेचं वर्णन करून, आपल्याला चटका

लपवून गेलेल्या प्रिय सुहृदाचं चित्रण " बा मृत्यो " या लेखांत लेखकानं केलं आहे. लेखक मोठा झाला. शिक्षण पूर्ण होऊन व्यवसायानिमित्त तो शहरांत राहू लागला. पण " शहरी " झाला नाही. लहानपणी गावाकडच्या मातीने जे संस्कार घडवले हे संस्कार शहरी, यांत्रिक आणि कृत्रिम जीवनाने कधी नष्ट झाले नाहीत. पायाला लागलेली पंढरीची माती डांबरी रस्त्यावरुन चालतानाही कधी सुटली नाही. आपल्या शेजारी कोण राहतंय याची वास्तपुस्त किंवा जाणीवही नसलेल्या शहरी जीवनांत लेखकाला " गावाकडची नाती " ( पान. ६२) आठवतात. निष्पाप, निर्व्याज, निष्कपट, करुणेनं ओलाव लली, माणसुकीचा सुगंध उधळणारी, श्रद्धेचा गोड शिडकावा करणारी, डोळ्यांत हातात माया जोपासणारी ही गावाकडची नाती ! विठूबाबा चांभार, विठूदा गुरव, त्याची बायको सारजाक्का, मारुतीनाना तराळ, राघुदा सुतार, एकतारीवाला अत्तरकर, बापू न्हावी आणि रहिमानकाका या गावाकडच्या माणसानी लेखकाच्या संस्कारक्षम मनावर आपली छाप उमटवलेली. भिन्न जातीची, गरीब पण माणुसकी जपणारी ही माणसं म्हणजे लेखकाच्या बालपणाचा अमोल ठेवा. ही माणसं लेखकाला जगण्याची रीत शिकवितात. " माणसं माणसासारखी वागायचा तो काळ असावा" हे शेवटचे वाक्य लेखकाची वर्तमानकालीन खंत मुखरित करते.

" चाफा " : काव्यात्म ललित लेख

" चाफा " हा लेख म्हणजे भावनांची मृदुतरल कारंजी फुलविणारी कविताच. कथेच्या अंगाने वाटचाल करणारा हा ललितनिबंध मालूच्या दुर्दैवी जीवनाचे दशावतार दाखवतो. मालू ही लेखकाची बालमैत्रिण. रूप आणि गुणसंपन्न. " तिच्या मोहक डोळ्याकडे, लाल ओठाकडे पहात रहावसं वाटायचं. शरीराचा बांधा ठसठशीत. बोलणं तर मनमुक्त. हसायला लागली तर हंड्याझुंबर झुलायची. इतकी तरतरीत,

चपळ की नुसता झोपाळाच. झोकेच झोके "[६] अशी ही मालू. लेखकाचं बालपण तिच्याबरोबर खेळण्याबागडण्यांत, हुंदडण्यांत गेलेलं. एकदा ती म्हणाली - " आपण चाफा लावू ". चाफा लावला. तो फुलला पण तिच्या चौसोपी वाडयात, परडयात, भोलेश्वरांच्या देवळांत हिंडण्याफिरण्यांत दोघांही तहानभूक विसरायची. पण एके दिवशी मालूच्या वडिलानी गाव सोडलं. नंतरच्या कालखंडात लेखकाला तिचा पत्ताच लागला नाही. लेखक मोठा झाला. त्याचं नाव चौमुलुखात झालं. पण मालू भेटली नाही. लेखकाच्या बायकोला-सुनंदाला अचानक एकेदिवशी चाप्याखाली बसून कुणी रडत असलेलं दिसलं. ती मालूच होती. गावात तिचं कुणी राहिलं नव्हतं. घरदार भावानी विकलं होतं. कसलंच नातं नव्हतं, गावात. होतं ते चाप्याचं वा चाप्याच्या सहवासात झरुन गेलेल्या बालपणीच्या आठवणींचं. किरकिरी मुलांच्या, अंथरुणाला खिळलेल्या नव-याच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून माहेरगावच्या देवाला वंदन करण्यासाठी मालू आली होती. लेखकाबरोबरच्या संभाषणातून तिचं दुर्दैवी जीवन कळून येतं. मालू भेटल्यानं लेखकाचं बालपण जिवंत होतं. " हा मधला मुलगा पोटात होता तेव्हा कुणास ठाऊक पण सारखी या चाप्याची आठवण यायची. म्हणून तर तो इतर दोघापेक्षा चांगला निपजला नसेल "[७] हे तिचं वाक्य खूपसं कांही सुचवून जातं. लेखक आणि मालूला जोडणारा सेतू म्हणजे हा चाफा. मालू गेली. खिडयाला चाप्याची वेणी अडकवून पण तशीच गेली नाही. अंतःकरणात, दुर्दैवाच्या दशावतारातही ज्याला अखंड पूजिलं त्या लेखकाचा फोटो जातांना घेऊन गेली. लेखकाला हे कळल्यावर त्यानं - " बाहेर चाप्याकडे नजर टाकली. चाफा बहरुन उभा होता. अंगभर आमचं बालपण घेऊन. " भारावून टाकण्याची एक विलक्षण मंत्रशक्ती या लेखांत सर्वत्र भरुन राहिलेली. अभिव्यक्तीचे रुप कथांगानं घडवल्यामुळे बालपणीच्या या भावानुभवाला विलक्षण परिणामकारकता लाभली आहे. एका छोटया भावसूत्राच्या आधारे लेखाला केवढया उंचीचं लालित्य, सौंदर्य प्राप्त होतं त्याचा " चाफा" हा

ललितनिबंध एक उत्कृष्ट नमुना आहे. निबंधकाराची आणि कथाकाराची भूमिका " ये हृदयीचे ते हृदयी " घातल्यासारखी विलक्षण एकजीव झालेली आहे. संवेदनशीलता हा या निबंधाचा आत्माच आहे.

अकलेचं झाड : एक रंजक किस्सा

" अकलेचं झाड " या लेखात लेखकाला अकलेच्या झाडाचे दिवस आठवतात. लेखक वाचकांना आपल्याला अक्कल नसलेल्या कालखंडात घेऊन जातो. अक्कल नसलेले दिवस केवळ लेखकाचेच नसतात. ते सर्वांचेच असतात. कारण अक्कल नसलेल्या कालखंडातून, बालपणातून सर्वांनाच जावे लागते. घरातील आईवडील, शाळेतील गुरुजी, आपले संवगडी सगळेच जणुं आपली अक्कल काढीत असतात. अनेकवेळा, अनेकांच्याकडून आपली अक्कल काढून घेत, अकलेच्या झाडाच अक्कल खाऊन पदवीधरानाही ला जणा-या गुलाबच्या अकलेचा एक किस्सा लेखक वाचकाला ऐकवतो. किश्श्यांत थोडीशी अद्भुतता असते, लोकविलक्षणपणा असतो. शिवाय त्यांत रंजकताही असते. ग्रामीण जीवनातील अनेक किस्से शंकर पाटील आणि मिरासदार यांनी सांगितलेले आहेत. ललितनिबंधाच्या आवाक्यात फापटपसारा ( किश्श्याला पाल्हाळ लागतो ) न लावता., गुलाबच्या अकलेची तारीफ करण्याच्या संदर्भात गावातील चोरीदरोडयाचा एक किस्सा नलगे यांनी या ललितनिबंधात सांगितला आहे. हा किस्सा रंजक आहे. विद्यापीठातून जी अक्कल प्राप्त होत नाही, ती जीवनाच्या आखाडयातून प्राप्त करुन घेतलेल्या गुलाबच्या अकलेपुढं शहरी लेखक शरणागती पत्करतो. गुलाबच्या स्पानं अकलेचं झाड खदाखदा हसतंय असं लेखक शेवटी म्हणतो.

"स्मरण" - बालपणाच्या पूर्वस्मृती ही ललिनिबंधाची प्रभावी प्रेरणा आहे. याचे प्रत्यंतर " चंद्र चांदण्याच्या साक्षी " या लेखांत येते. हा लेख बालपण, बालपणातील प्रेरणा, बालपणाची स्वप्ने आणि भावी आयुष्याच्या दृष्टीने बालपणाचे महत्व सांगणारा आहे. बालपण म्हणजे चंद्रचांदण्याची ओढ, आर्टिंगबालातलं रोमांचक विश्व, अलिबाबाच्या गुहेतील अद्भुतता अबलख वारूवर स्वार होऊन येणारा स्वप्निल राजकुमार,

हरिश्चंद्राच्या रोहिदासाच्या भुकेचा कोलाहल आणि शिवबाची रोहिडेश्वराच्या मंदिरातील शौर्यप्रेरणा, निसर्गभूली, लोकजीवन, आणि लोककला यांच्या सहवासातून प्राप्त होणारी आत्मिक उंची, जीवनाची नवनवीन क्षेत्रे धुँडाळण्याची युयुत्सूवृत्ती, लावण्यभू आणि निळाईच्या आकाशाची सुंदर आणि रौद्र रूपं, भव्य, उदात्ताच्या ओढीतही प्राप्त होणारं दुर्घट, दुर्धरत्व आणि अतीव हळुवारपणे मनांत जोपासलेला " जिप्सी " म्हणजे बालपण [ अफाट आकाशालाही कवेत घेऊ पाहणा-या बालपणांतील स्वप्निल सौंदर्य आणि आदर्शांचा मोरपंखी मुकूट मस्तकी धारण करावयास लावणा-या कलात्म प्रेरणा पुढील आयुष्यांतील जीवनाला एक कणाखरपणा प्राप्त करुन देतात.

## ग्रामजीवनाचा ललितरम्य वेध

" गावाकडची माती "तील सर्व ललित लेखांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर आपल्याला प्रकर्षाने एक गोष्ट दिसून येते, ती म्हणजे या सर्वच लेखानी ग्रामजीवनाला -ग्रामसंस्कृतीला स्पर्श केलेला आहे या पुस्तकाचे वेगळेपण म्हणजे पहिल्यांदाच ललितलेखांतून ग्रामजीवनांतील सर्व सांस्कृतिक अंगांचा ललितरम्य वेध घेण्यांत आलेला आहे. ग्रामीण कथा-कादंबरी आज समृध्द झालेली आहे. या कथा-कादंब-यांतून ग्रामीण जीवनाचे चित्रण " कथेच्या अनुषंगाने " आलेले आहे, नाही असे नाही. पण त्याला कथानकाच्या चौकटीमुळे मर्यादा पडलेल्या आहेत. ( खुद्द नलगे यांची कथा कादंबरी याला अपवाद नाही ) एखाधा कथेत आर्थिक अंग आले असेल किंवा एखाधा कादंबरीत राजकीय किंवा सामाजिक संघर्ष आला असेल ( गोतावळा, गांधारी, पाचोळा इ. ) पण या सर्वांच मिळून जी एक ग्रामसंस्कृती बनते, तिचा साकल्याने लालित्याच्या भूमिकेतून कुणी वेध घेतलेला नाही. ग्रामसंस्कृतीत राजकीय, आर्थिक आणि सामाजिक संघर्ष यांच्याबरोबरच शिक्षण,

निसर्ग, लोकरीती, लोकजीवन, धार्मिक-अधार्मिक समजुती, लोककला, सण-यात्रा-उत्सव, दंतकथा -आख्यायिका, भूत आणि तंत्रविद्या यांचाही समावेश होतो आणि या सर्वांचा एकसमयावच्छेदेकरून वेध घेणे आणि त्यावर कादंबरी बेतणे हे लहानसहान प्रतिभेचे काम नाही. कथानकाच्या अनुषंगाने ग्रामीण साहित्यिकानी यापैकी एखादद्दुस-या अंगाचा पार्श्वभूमी म्हणून वापर करणे वेगळे आणि त्या अंगाला प्राधान्य देऊन त्यातील लालित्य-सौंदर्य, सौंदर्यदृष्टीनं टिपून कलात्मक अभिव्यक्तीने नागर किंवा ग्रामीण वाचकाला, त्या सौंदर्याचा प्रत्यय आणून देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी ग्रामसंस्कृतीतील एकेक अंगाचा, आपल्या बालपणांतील आठवणीद्वारे वेध घेतलेला आहे.

आठवणींची रंगपंचमी

हा वेध घेतांना त्यानी वर्तमानकाळ दूर केला आहे. आपल्या शैशवाठवणी, स्मरण याना प्राधान्य देऊन, अनुभव विकृत होऊ न देता, या ग्रामसंस्कृतीतील गु-हाळ, हुरडा, सुगी आणि तू, शिक्षण यात्रा, तमाशा, ल्हावसट, भूप्रदेश, नाती, शेतक-यांची आर्थिक अनवस्था यांचा सौंदर्यवादी मनाने घेतलेला वेध या विविध लेखांतून दिसून येतो. माणुसकी, प्रेम, जिव्हाळा आणि प्राणीमात्राविषयी करुणा जोपासणारी अशिक्षित पण मोठया मनाची माणसं यालेखांतून भेटतात. मातीची ओढ, सुगी सुरु झाल्यावर गावात होणारं देवाजीचं आगमन, लोककला जोपासणारी डोंबारी, कोल्हाटीण, दांगट, बहुरुपी इ. सामान्य माणसे ग्रामसंस्कृतीला जिवंतपणा आणतात. पावसावर अवलंबून असणा-या कृषकाच्या जीवनांत ही मंडळी आनंदाची, उत्साहाची आणि उल्हासाची बरसात करीत असतात. निसर्ग, विशिष्ट भूप्रदेशाशी

वारणा-खो-याशी -निगडित असणा-या दंतकथा यानी मानवी जीवनावर प्रकाश पडतो. आपल्या सोनसावळ्या सौंदर्याने मनाला चैतन्य देणारा श्रावण, याश्रा उफळून देणारा ग्रीष्मातला वादळवारा, बोच-या थंडीतील सुगी आणि हुरडयाचे दिवस यातील लावण्याने लेखकाचे बालपण मोहरुन गेले, रंगून गेले. त्या आठवणींचा रंग सदैव ताजा, गहिरा, अम्लान, चैतन्यमय! या रंगाने " गावाकडची माती" तील सारे लेख रंगून गेलेत. आठवणींची रंगपंचमी साजरी केलीय शब्दानी! या शब्दांच्या अभिव्यक्तीचा थाटही तितकाच अनोखा, देखणा ग्रामसंस्कृती गोचर करणारा !!

## बालमनाचा नितळ आविष्कार

नलगे वारणाखो-यात जन्मले, वाढले आणि या खो-यातल्या मातीने त्यांच्यावर संस्कारही घडवले. या मातीशी संबंधित अशा बालपणातल्या अनुभवांचे चित्रण त्यांनी या लेखसंग्रहात केले आहे. आपल्या ठिकाणच्या मुक्त आणि स्वैर सौंदर्यदृष्टीला त्यानी मोकळी वाट करुन दिल्यामुळे, विविध अनुभव त्यांना शब्दबध्द करता आले. बालमन मुळातच जिज्ञासा प्रिय असते. या मनाला सत्य जाणून घेण्याची जेवढी जिज्ञासा असते, तेवढीच येणा-या आणि येत असलेल्या अनुभवाना आपली कल्पकता बहाल करण्याचीही ओढ असते. एखादी गोष्ट ऐकली, की बालमन त्या गोष्टीबद्दल विचार करु लागते, विचार करताना आपली कल्पकता ते मन स्वैर सोडते. बालमनाच्या या स्वैर कल्पकतेत सौंदर्य असते, निरागसता असते आणि निव्याजपणाही. त्यामुळे आलेल्या अनुभवाची स्वतःशी पुनर्रचना करतांना या मनाला असत्याचा, पूर्वग्रहाचा, अतिशयोक्तीचा अवलंब करण्याची, किंवा विशिष्ट दृष्टीतून अनुभव न्याहाळण्याची आवश्यकता वाटत नाही. नलगे या ललितलेखातून आपल्या

बालमनाला आलेल्या अनुभवांचे जसेच्या तसे चित्रण करतात. हे चित्रण करताना त्यांचे प्रौढमन कुठच्या कुठे पळून गेलेले असते. वर्तमान-काळ विसरुन भूतकाळाशी समरस होऊन नलग्यांचे मन स्वैर विहार करु लागते. या मनावर कोणत्याही " सांस्कृतिक " दृष्टीची छाप नाही. त्यामुळे अनुभवातील सौंदर्यदर्शन ते मन नितळपणे करुं शकते.

नलगे यांच्या बालमनापुढे सांस्कृतिक झडपा नसतात. जत्रेतील दिवस असोत, भुताखेतांच्या गोष्टी असोत, जंगलकातळाजून हुंदडणे असो, शाळेतील गुरुजींचा मार असो, खाजकुइलीचा खोडकर प्रकार असो किंवा नीळकंठेश्वराच्या मंदिरातील पितळी आणि चांदीच्या मूर्तींमुळे मनांत उठलेले द्वंद्व असो - या सर्वच अनुभवाना नलगे यांचे बालमन निरागसपणेच सामोरे जाते. व्यक्तिचित्रण असो वा स्थळचित्रण असो किंवा निसर्गचित्रण असो नलगे यांचे बालमन कधी प्रौढमनाचा स्वीकार करीत नाही. त्यामुळे हे बालमन नलग्यांचे बालमन न राहतां सर्वांचेच बालमन बनून जाते. त्यामुळे आपण ग्रामजीवनातील या ललित अनुभवाशी सहज समरसून जातो. ग्रामसंस्कृतीतील, बालमनाने जपलेल्या श्रध्दाना जेव्हा तडा जातो, तेव्हा कुठे नलगे यांचे प्रौढमन एखाद्या वाक्यापुढे उद्गारचिन्ह टाकून काळाला सांधून जाते. बालमनाने जे अनुभव घेतले, त्याचे वास्तव आणि सर्वस्पर्शी चित्रण या लेखामधून येते. अनुभवातील नावीन्याच्या ओढीने, कल्पकतेच्या पातळीवरुन शहरी वाचक त्या अनुभवाशी एकरुप होतो आणि आपलेच अनुभव, आपल्या नजरेतून निसटलेल्या सर्व सौंदर्यछटा घेऊन अवतरलेले पाहून ग्रामीण वाचक हळूच स्मित करतो - या दोन्ही गोष्टी एकाचवेळी प्रत्ययाला आणून देण्याचे कसब नलगे यांना साधले आहे. आणि म्हणून बालपणीच्या आठवणीवर आधारलेले हे लेखन आकर्षक झाले आहे. निष्पाप, निरागस बालमनाने जे अनुभव घेतले, त्या अनुभवांची रसपूर्ण अभिव्यक्ती या पुस्तकात झाली आहे. खेड्यातील सा-या घटनाकडे, लोकाकडे आणि निसर्गाकडे

हे बालमन अतिशय कुतूहलाने पाहते. असे पाहत असतांना अनुभवाचे जे जे पदर जाणवले ते ते सर्व बालमनाने इथे शब्दांकित केले आहेत. त्यामुळे या लेखनाला एक अकृत्रिम सौंदर्य प्राप्त झाले आहे.

औत्सुक्य, जिज्ञासा आणि जे अनुभवाला आले त्याची कल्पना विश्वात पुनःनिर्मिती ही बालमनाची वैशिष्टये आहेत. ही वैशिष्टये लेखकाने आपल्या प्रौढपणीही जोपासली, जपली आहेत. म्हणूनच या लेखातील अनुभवाना वास्तवाचा, प्रचीती"चा पाया आहे. ही प्राचीती लेखकाच्या प्रौढ मनापासून खूप दूर आहे. या सर्व लेखनातून एक एक निर्मळ, निव्याज सौंदर्य झिरपत आहे.

" चिकित्सक " आणि " चिंतनशील " बालमन

हे बालमन केवळ निष्पाप नाही, ते चिकित्सकही आहे. प्रत्येक अनुभवाकडे ते जिज्ञासेने पाहते. तो अनुभव, त्याविषयी मनांत उठणारे भावतरंग रूपरसगंधासह अभिव्यक्त होतात. विविध अनुभवाच्या भावप्रतिमा हे बालमन शब्दबध्द करते. अनुभवाला हवा तसा रंग देणे, त्या अनुभवाचा रंग गडद करणे आणि आपल्या " बालपणी" आपण किती " मोठे " होतो याची वाचकाकडून तारीफ करुन घेणे-अशा प्रकारची वृत्ती, प्रवृत्ती, इथे दिसत नाही. एखाधा घटनेबद्दलच्या प्रतिक्रियाही स्वाभाविक तात. उदा. "सोनमळ " " या लेखांतील देवळांत भेटलेली विषयासक्त नजरेची स्त्री, " चाफा" या लेखांतील मालू या बालमैत्रिणी-विषयीच्या प्रतिक्रिया या सा-या प्रतिक्रिया भावतरंग लेखकाने बालसदृश हळुवारपणे टिपलेल्या आहेत. म्हणूनच या अनुभवांना एक प्रकारचे रोमांचकत्व येते.

या बालमनाच्या व्यक्तित्वाचा आणखीन् एक विशेष दिसून येतो.

हे बालमन एखाद्या अनुभवाचा साक्षीदार म्हणून या लेखातून प्रकट होत नाही. " साक्षित्वा" बरोबर त्या बालमनाची चिंतन-शीलता"ही अभिव्यक्त होते. मात्र हे चिंतन बालमनाचे आहे हे भान ठेवणे आवश्यक आहे. नीलकंठेश्वराच्या पितळी आणि चांदीच्या मूर्तींबद्दलचे चिंतन असेच वैशिष्टयपूर्ण आहे. हेच चिंतन "गावाकडची माती " यांत बरेच प्रौढ बनते. वाढत्या वयाबरोबर हे चिंतनही वाढत गेलेले आहे. " चाफा"तील मालूच्या पुनर्भेटीनंतरच्या क्षणांचे चित्रण या दृष्टीने अभ्यसनीय आहे.

बालमनाला " माणसे " प्रिय

नलगे यांच्या बालमनात अनेक व्यक्तींना नितांत आदराचे स्थान आहे. डोंबारी, माकडवाला यांच्याबरोबर चांभाराचा विठू, मांगाचा मारुतीनाना, सगुणनिर्गुणाची कोडी घालणारा अत्तरकर, बापूदा-न्हावी इ. मंडळी लेखकाच्या मनांत कायमची घर करुन बसलेली आहेत. ही माणसं, या माणसानी जोडलेली नाती म्हणजे लेखकाला वैराण वाळवंटातील हिरवळी वाटतात. माणुसकीचं, जिव्हाळयांच आणि प्रेमाचं तत्वज्ञान या माणसानी लेखकाला शिकवलं. " बुकं"न शिकलेल्या या माणसानी दाखवलेली माणुसकी "सायबा"च्या थोबाडांत मारणारी आहे. नामदेव, शिवशंकर, बबनराव, लक्ष्मणराव, भानू आणि पब्या यांच्या मृत्यूमुळं लेखकाचं मन अतिशय हळवं बनतं. हे केवळ " दोस्त" नव्हते तर सामान्यांतील "असामान्य आदर्श" होते. मोजक्या शब्दांत त्यानी जीवनाशी दिलेल्या झुंजीच चित्रण लेखकाने समरसून केलं आहे.

जीवनचित्रणांतील अस्सलपणा"

" गावाकडची माती " तील सगळया लेखांना त्या मातीचा रंग चिकटलेला आहे. लेखकाचे बालपण ज्या वारणाखो-यात-भेडसगाव

आणि त्याचा परिसर-गेले त्या खो-याचे प्रसंगानुरूप प्राकृतिक सौंदर्य आणि ग्रामजीवनांतील मानवी सौंदर्य यांचा सुमेळ येथें सहजच साधला आहे. म्हणूनच डॉ. वा. द. कटांबळे म्हणतात - " सर्व लेखांचा बाज ग्रामीणच आहे. वैचारिक, वाङ्‌मयीन, कथात्मक, कल्पनारम्य, स्मृतिचित्रात्मक अशा स्तरांचे मिश्रण या विविध लेखांतून झालेले दिसते. एक ठळक वैशिष्टय म्हणजे त्यांच्या सर्वच ललित व ललितेतर वाङ्‌मयांत ग्रामीण पार्श्वभूमी ( सेटिंग ) आहे. दुसरे म्हणजे परंपरागत धार्मिक, सामाजिक व आर्थिकदृष्टया जीवनाची अंगे इथे चित्रित केलेली आहेत. ग्रामीण कथावस्तू, विषय, पात्रे, बोली सर्व कांही ग्रामीणच. पण ते सर्व चित्रण अगदी अकृत्रिम कारण लेखकच ग्रामीण संस्कारांत वाढलेला व घडलेला असल्याने त्याच्या संपूर्ण दृष्टिकोनाला अस्सलपणा (ऑथेंटिसिटी) आलेला आहे. एखाद्या नागरी लेखकाला ग्रामीण जीवनाचे चित्रण करतांना करावी लागणारी ओढग्रस्त व आणावा लागणारा अभिनिवेश इथे अजिबात दिसत नाही. ग्रामीण घटना व व्यक्ती त्यांच्याच परिसरांतील व परिवारांतील असल्यामुळे व ग्रामीण बोलीवर लेखकाचा हातखंडा असल्या-मुळे त्याच्या लिखाणाला अस्सलपणाची सर्व परिमाणे लाभलेली आहेत"[८] वरील उता-यांत कटांबळे यांनी नलगे यांच्या सृष्टिजीवन आणि मानवी जीवन यांच्या चित्रणांतील " अस्सल पणा"वरच नेमके बोट ठेवले आहे, आणि त्याचा प्रत्यय या सर्वच लेखांतून येतो.

## विलोभनीय आत्माविष्कार

लेखकाला आपल्या गावाबद्दल, गावातील माणसाबद्दल ग्राम-जीवनातील विविध सांस्कृतिक अंशाबद्दल विलक्षण जिव्हाळा आहे,

प्रेम आहे. या जिव्हाळ्यामुळे लेखनांत जो आत्माविष्कार झालेला आहे, तो अत्यंत विलोभनीय आहे. जिव्हाळा हा लेखनविशेष लेखक आणि वाचक यांच्यात एक अतूट भावसंबंध निर्माण करतो. लेखकाप्रमाणे वाचकालाही या गावाकडच्या मातीची ओढ लागते. या जिव्हाळ्यामुळे बालपणांतल्या सर्व आठवणींना, स्मरणांना रसार्द्र रूप प्राप्त झाले आहे. आत्मविष्कारामुळे लेखनाला भावगर्भता, भावशीलता येते. आणि भावगर्भ लेखन हे नेहमीच लालित्याला, सौंदर्याला जन्म देत असते. "गावाकडची माती "तही त्याचा प्रत्यय येतो. गावाकडच्या नात्याबद्दल लेखक जेव्हा लिहू लागतो तेव्हा अनुभवांतील हृदयस्पर्शित्वामुळे लेखनाला एक आगळी संवेदनशीलता येते. तथापि हे लेखन कधीच melodramatic बनत नाही. भावविवशतेपासून लेखनाला अलिप्त ठेवण्यांत नलगे यांना कमालीचे यश आलेले आहे. विविध भावनांच्या आविष्कारामुळे "गावाकडची माती " या पुस्तकाचा आस्वाद म्हणजे "आनंदडोहांत डुंबणे होय असे प्रा. गंदा कदम यांना वाटते. त्या म्हणतात" "आनंद, माया भयानकता, उत्सुकता, प्रीती, मृत्यूबद्दलची गूढता, आणि काव्यात्मकता अशा अनेक भावतरंगांची उधळण ( या पुस्तकांत ) झाली आहे. भावभावनांना बध्द करतांना सत्दृष्टीची हळुवार शलाका शब्दाना विणत गेली आहे. निसर्गाचे ऋतू जसे बदलतात, तशीच गावाकडच्या घटनाप्रसंगांची मालिका बदलते. एक नवे विश्व, एक नवा संदर्भ घेऊन गाव उभे राहते. वादळांतले, पावसातले, भुताखेतातले, जत्रेयात्रेतले, हुरड्यातले गु-हाळातले ! असे अनेक ऋतू आणि याच चंद्रचांदण्याच्या साक्षीत लेखकाचे बालपण रंगलेले आहे, तोल सावरत उभे राहिले आहे, हळूहळू चालू लागले आहे... समज येण्याच्या गावशिवेपर्यंत येऊन थांबले आहे. अशी ही "गावाकडची माती." एकंदरीत हा एक आनंदडोह आहे"[१]

काव्यात्मता

" मातीचे डोहाळे " " सोनसळ ", " जत्रांचे मंतरलेले दिवस" " चंद्र चांदण्याच्या साक्षी ", " चाफा" इ. लेखांतून लेखकाच्या "काव्यात्म" व्यक्तिमत्वाचे दर्शन होते. नलगे मूळांत कवी. कथाकादंबरीच्या धबड-ग्यांत हे कविमन बाजूला फेकले गेलेले. या ललितलेखसंग्रहांत मात्र या काव्यव्यक्तिमत्वाचा चांगला आविष्कार झालेला दिसून येतो. हळुवारला, तरलपणा, संवेदनशीलता, भावोर्मी, सौंदर्यपिपासावृत्ती आणि कल्पकता हे कविमनाचे सारे विशेष या लेखसंग्रहांत प्रामुख्याने जाणवतात. कथा-कादंबरीत दबलेल्या काव्योर्मींना इथे चांगली वाट मिळालेली आहे. निसर्गाच्या सहवासांत झालेला लेखकाचा सौंदर्य "शोध " वाचकानाही चांगला " बोध " करुन जातो. लेखकाच्या कल्पकतेची अनेक उदाहरणे देता येतील." मातीचे डोहाळे " या लेखाच्या सुरवातीलाच लागलेली काव्यात्म चिंतनसमाधी, देवळांतल्या हनुमंताच्या गदेवरची पाल चुकचुकल्यानंतर लेखकाच्या मनांत सचित्र झालेलं महाभारत, " सोनसळ " या लेखांत निसर्गसौंदर्यानं डंवरुन आलेली दिव्यत्वाची ओढ, तिच्या भेटीचा तो Thrilling ओलेता क्षण गावाकडील एकएका वाटेचं वेगळेपण, जंत्राच्या मंतरलेल्या दिवसांचं वर्णन, वादळवा-याच्या तुफानाचं चित्रण, लेखक आणि मालू यांच्यातील निष्पाप भावसंबंधाचा साक्षीदार असा तो चाफा इ. अनेक ठिकाणी लेखकाच्या काव्यप्रवृत्तीला उधाण आलेलं आहे. या वर्णनांना " पाल्हाळ" वर्ज्य आहे. बांधेसूदपणा, नेमकेपणा आणि नेटकेपणा सीमितता, अर्थगौरव, आटोपशीरपणा, आणि मिताक्षरत्व हे या वर्णनशैलीचे उल्लेखनीय विशेष आहेत. " चाफा " या लेखांतील अनुभवच मूळांत अतिशय काव्यात्म आहे. याललितलेखाची अभिव्यक्ती या दोन्हीतील काव्यात्म-तेमुळे एक चांगला आकृतिबंध या लेखाला प्राप्त झालेला आहे. लेखकाची ही काव्यात्म शैली सा-या संवेदनाना आकळते, वर्णन गोचर

करते. " जंत्रीचे मंतरलेले दिवस " मधील मोहनाचे पुढील वर्णन लक्षणीय आहे - " तरतरीत ठसठशीत, गोलाईदार, आटीव बांध्याची, नजरेच्या विजेनं काळजं पेटवीत जाणारी, कलदार अबलख, चालीची, इष्कबाज भुवयांची, डाळिंब फुटल्या ओठांची, बावनखणीची, मराठमोळी ही मोहना पण तरीही " नार नख-याची" सगळ्यांच्या काळजाचं जणू हे लाखमोलाच झुंबरच ठरते । "[10]

## शैलीतील रांगडेपण आणि प्रतिमांचा वापर

नलगे यांची लेखनशैली अनुभवाला गोचर करणारी अशी आहे. अनुभवाचे सर्व पैलू साक्षात करण्याचे, निवेदन कधी सरळ तर कधी सूचित करण्याचे, आशय प्रतिमाद्वारे वाचकापर्यंत संक्रांत करण्याचे कसब या शैलीला लीलया जमते. नलगे एखादा भावाशय सांगतांना, तो निसर्ग प्रतिमाद्वारे सांगतात. प्रतिमांचा मुक्त वापर इथे पहायला मिळतो. अनुभवाचा पाल्हाळ न लावता, एखाद्या प्रतिमेद्वारे तो अनुभव सूचित करण्याकडे लेखकाचा कल दिसून येतो. लेखकाचे व्यक्तिमत्व काव्यानुकूल, संवेदनशील असल्यामुळे त्याला प्रतिमांची शोधाशोध करावी लागत नाही. त्याचे निसर्ग अवलोकन सूक्ष्म असल्यामुळे आशयानुकूल अशी प्रतिमा त्याला सहज मिळून जाते. नलगे यांच्या लेखनशैलीबद्दल डॉ. वा. द. कटांबळे यांचा अभिप्राय फार बोलका आहे. ते लिहितात - " नलगे यांच्या शैलीत ग्रामीण रांगडेपण जरुर आहे. पण ते तिची स्वाभाविकताच दाखविते. निसर्ग व सुखदु:खांचे प्रसंग रंगवतांना त्यांची शैली सर्व बारकाव्यानिशी मोहरून येते. ग्रामीण वाक्यप्रचार , वचने, वळणे, बारकावे सर्वच वाचकांना माहित नसतात. विशेषत: पूर्ण नागरी वाचकांना ती एक वेगळीच भाषा वाटते. त्यामुळे वाङ्मयाचा वाचकही स्तंभित होतो. नव्हे, नागर वाचक अशा लिखाणाला वंचित होतात. शिष्ट व ग्राम्य शब्दांची पखरण अशा वाङ्मयात प्राचुर्याने होते. मुल्कराज आनंद यांच्या इंग्रजी कादंब-यात व मराठीतील

अनेक लोकांच्या लिखाणात त्या आढळतात. पण नलगे यांनी या आयुधाचा वापर फारच संयमाने व वास्तवनिर्मितीला आवश्यक तेवढाच केला आहे. त्यांचे ग्रामीण शब्दवैभव चांगले आहे. उदा - चांदण डोहाळे, अंजनगारवा, घुगऱ्या, शिंगाचे डोंबे, सुतारमेडा, बाभळीची फांजर, कासंडीची दंताळी, धान्याचा दामटा, धोंगड कांबरून आकाशाला पालाण घालणे, रानभैर इ. शब्द व वाक्यप्रयोग सहजपणे व योग्य संदर्भात वापरले गेले आहेत. त्यांनी उपमा, दृष्टान्त व प्रतिके चपखलपणे बसविलेली आहेत"[11] नलगे यांची भाषा अत्यंत तरल, हळुवार आणि रसार्द्र असल्यामुळे लेखनाला " चैतन्य" आलेले आहे. रंग, रूप, गंध आदि सर्व संवेदनानी युक्त अशा शब्दकळेमुळं वर्ण्य विषय, किंवा वस्तू " दृश्य " ( Visual )होतात " सोनसळ " या लेखांतील दृक्प्रतिमांचा वापर लक्षणीय आहे.

## समारोप

मात्र " गावाकडची माती "तील सर्व लेख अभ्यासतांना एक गोष्ट जाणवते ती ही, की यांतील प्रत्येक लेख हा लेखकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यांत " सलगता" नसली तरी हे लेखन आस्वादाच्या पातळीवर जाते. कारण आत्माविष्कार, स्थलदर्शन, व्यक्तिचित्रण, प्रवास, लेखकाच्या आवडीनिवडी, त्याची श्रध्दास्थाने, त्याची तर्क-जिज्ञासा अशा कितीतरी गोष्टींचे मिश्रण या लेखनांत झालेले आहे. लेखकांची Nostalgia वृत्तीही पानोपानी दिसून येते. त्यामुळे ज्याला आपण " अनुभवाची सलगता" म्हणतो ती इथे दिसत नाही आणि हा कांही गंभीर दोष होऊ शकत नाही. मुळांत ललित गद्याच्या प्रकृतीतच अनुभवाची सलगता बसत नाही किंवा अपेक्षितही नाही. कारण लेखकाच्या जीवनांतले अनुभव "कालसलगता" घेऊन अवतरले तर त्या लेखनाला " आत्मचरित्रपर " लेखन म्हणावे लागेल. स्मरण ही ललितगद्याची प्रेरणा असते ही गोष्ट खरी, तथापि स्मरणाधिष्ठित लेखनांत लेखकाचा 'आत्माविष्कार' असला, तरी त्यांत लेखकाचे

आत्मचरित्र नसते.

" बा, मृत्यो " आणि " गावाकडची भुतं " या दोन लेखातील अनुभवांना स्पंदनाचे रूप प्राप्त होत नाही, येथील लेखन गद्याच्या सरधोपट पातळीवर राहते. याच्या उलटची स्थिती " सोनसळ " या लेखाची झालेली आहे. अलंकरणाच्या अतिरिक्त हव्यासामुळे, अतिशय काव्यात्मकतेमुळं " सोनसळ " मधील " अनुभवं"च धूसर झालेला आहे. असे काही अपवाद सोडल्यास ग्रामजीवनांतील ललित अनुभवांची समर्थ अभिव्यक्ती " गावाकडची माती " या पुस्तकात झाली आहे, हे त्याचे वेगळेपण ठळकपणे लक्षांत राहते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# संदर्भटीपा


१. नलगे, चंद्रकुमार

" गावाकडची माती "

प. आ. पृ. १४

२. तत्रैव

पृ. १५

३. तत्रैव

पृ. ३४

४. तत्रैव

पृ. ५५

५. तत्रैव

पृ. ५६

६. तत्रैव

पृ. ७०

७. तत्रैव

पृ. ७६

८. कटांबळे, वा. द्व.

गावाकडची माती : एक चिंतन संपा. मधुकर वेदान्ते

प. आ. पृ. २५

९. कदम, मंदा

गावाकडची माती : एक चिंतन संपा. मधुकर वेदान्ते

प. आ. पृ. ३५

१०. नलगे, चंद्रकुमार
"उनि"
पृ. ३४

११. कटांबळे, वा. द.
" उनि "
पृ. २९.